# सोलापूर शहर पोलीस

## पोलीस शिपाई भरती - 2022/23

पोलीस शिपाई भरती, 2022-23 साठी मैदानी चाचणी दिनांक 19, 20 व दिनांक 25/06/2024 रोजी घेण्यात आली होती. सदर मैदानी चाचणीमध्ये उत्तीर्ण / अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची यादी दिनांक 25/06/2024 रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर यादीमधील नमुद बाबी, जसे मैदानी चाचणीचे गुण, सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, एनसीसी प्रमाणपत्र, इ. बाबत उमेदवारास काही आक्षेप असल्यास तसे या कार्यालयास 24 तासांचे आत कळविण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या.

नमूद कालावधीमध्ये एकही आक्षेप प्राप्त न झाल्याने उपरोक्त नमूद यादीमधून लेखी परीक्षेसाठी 1:10 प्रमाणे पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय यादी यासोबत प्रसिद्ध करण्यात येत आहे.

लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार, दिनांक 07/07/2024 रोजी सकाळी 10.00 ते 11.30 वा. दरम्यान SVCS HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE (श्री वीरतपस्वी चन्नावीर शिवाचार्य हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज), एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर या ठिकाणी घेण्यात येणार आहे.

उमेदवारांसाठी सुचना: -

1. लेखी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांनी रविवार, दिनांक 07/07/2024 रोजी सकाळी 07.00 वाजता उपरोक्त नमूद ठिकाणी लेखी परीक्षेसाठी हजर राहावे.
2. सर्व उमेदवारांनी वेळेमध्ये दिलेल्या ठिकाणी हजर राहणे बंधनकारक आहे. परीक्षा सुरू झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परीस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
3. उमेदवारांनी परीक्षेसाठी येतांना शासकिय ओळखपत्र, महाआयटीकडून यापुर्वी देण्यात आलेले प्रवेशपत्र व या कार्यालयाकडून शारीरीक चाचणीवेळी देण्यात आलेले पोलीस भरती ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे.
4. उमेदवारांना पॅड व काळ्या शाईचे पेन परीक्षेवेळी या कार्यालयाकडून पुरविले जाणार असल्याने मुद्दा क्रमांक 3 मधिल नमूद कागदपत्रांव्यतिरीक्त इतर कोणतेही साहित्य परीक्षा केंद्रावर घेवून जाण्यास मनाई आहे.